# REPORT

## DEPARTMENT OF ECONOMICS, HISTORY, POLITICAL SCIENCE & PALI-PRAKRIT

## GUEST LECTURE: 23-01-2019

## SPEEKERS: MR. SHASHIM JAMBHULKAR,

## THE UNIVERSITY OF QUEENSLAND, AUSTRALIA

**DR. AMBEDKAR COLLEGE**

NAAC REACCREDITED WITH 'A' GRADE
COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE
DEEKSHABHOOMI, NAGPUR-440 010. (M.S.)
■ PH. : 9579755443 ■ E-MAIL : dacn_ngp@rediffmail.com
■ VISIT US AT : www dacn.in

No AC / ___________ / ______

दिनांक: २२/०१/२०१९

**प्रसिध्दीसाठी**

अर्थशास्त्र, इतिहास, पालीप्राकृत व राज्यशास्त्र विभाग

आयोजित

वक्ते : शशिम जांभूळकर

विषय : विदेशात शिक्षण रोजगार नोकऱ्यांच्या संधी

वेळ : बुधवार दि. २३ जानेवारी, २०१९ सकाळी १०.३० वाजता

स्थळ : सेमिनार हॉल, रूम नं. १

प्रति,

विद्यार्थीगण

देशांतर्गत रोजगार—नोकऱ्यांसोबतच विदेशातसुध्दा संपूर्ण जगभर नोकऱ्या—व रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. आपल्याच महाविद्यालयाचे कला शाखेचे विद्यार्थी आयु. शशिम जांभूळकर हे उच्चशिक्षणाकरिता ऑस्ट्रेलिया या देशात जात आहेत. तिथे व संपूर्ण युरोप—अमेरिकेत उच्चशिक्षण व नोकरी—रोजगाराच्या संधीसंबंधी जाणून घेण्यासाठी वरील व्याख्यान आयोजित केले आहे.

या संधीचा लाभ घेण्यासाठी या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक यांनी आवर्जून उपस्थित राहावे.

---

मा. संपादक
दैनिक——————————
नागपूर.

महोदय,

वरील वृत्तास आपल्या लोकाभिमुख वर्तमानपत्रात उचित प्रसिध्दी द्यावी व कार्यक्रमास आपला प्रतिनिधी पाठवावा, ही विनंती.

आपला

(डॉ. पी. सी. पवार)
PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLLEGE
NAGPUR

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील अर्थशास्त्र, इतिहास, व पाली-प्राकृत विभागातर्फे दि. २३-०१-२०१९ रोजी ‘विदेशातील शिक्षण व रोजगाराच्या संधी’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या प्रसंगी ऑस्ट्रेलियाला उच्च शिक्षणासाठी जात असलेले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आयु. शशीम जाम्भूलकर विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शन करताना म्हणाले की उत्तम व प्रतिष्ठित रोजगार मिळविण्यासाठी देशातच नाही तर

जगातील विकसित देशांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध आहे. प्रादेशिकता' आपली भाषा, असे अनेक अडसर दूर करून ती प्रयत्नपूर्वक कला शाखेच्या विद्यार्थ्यांना सुद्धा मिळविता येतील, आणि चांगल्या स्थितीचे जीवन उभे करता येते. मात्र हा मार्ग अत्यंत खडतर व कष्टाचा असून तो चिकाटीने व जिद्दीने मिळवावा लागतो. आणि बाह्य शक्तीला कुठल्याही प्रकारचा आर्जव किवा याचना न करता तो मिळविता येतो. पण यासाठी स्वतःमध्ये आंतरिक शक्ती जागृत करावी लागते, आणि ती सतत तेवत ठेवावी लागते. हा मार्ग खडतर व कष्टाचा असला तरी तो असंभव स्वरूपाचा नसून स्वतःभोवती असलेला कम्फर्ट झोने बाजूला केल्याशिवाय तो मिळू शकत नाही. मात्र तो प्रकृती समृध्दी व विकास या सर्वाचा हा दूरवर असलेला निरभ्र असा अवकाश दूरदृष्टीने पाहणे आवश्यक आहे. याप्रसंगी मी निवडलेला हा कठीण प्रवास येणाऱ्या विद्यार्थ्यांची देखील प्रेरणा व्हावा. त्यांनीही आपल्या प्रगतीच्या दिशा शोधाव्यात अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी भाष्य करताना अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. गौतम कांबळे म्हणाले की, जीवनात स्थिर-स्थावर होताना विद्यार्थ्यांनी अथवा तरुणांनी एकाच दिशेचा विचार न करता त्या दिशेच्या दोन-तीन पर्यायांचा देखील विचार करायला पाहिजे. फक्त एकाच दिशेचा विचार करून जर अपयश आले तर त्या वेळी जीवन अत्यंत नीरस व तकलादू होते. अश्या वेळी पर्यायांचा विचार हा अत्यावश्यक ठरतो म्हणून केवळ स्पर्धा परीक्षा नाही तर उच्चशिक्षणाच्या चांगल्या जागा, परदेशीय शिक्षणाद्वारे चांगल्या नोकरीच्या जागा किवा रोजगार आणि त्याचबरोबर व्यक्तिगत व सामूहिक पातळीवरील संधी तरुणांनी शोधणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. अविनाश फुलझेले यांनी तर आभार प्रदर्शन पाली-प्राकृत विभागप्रमुख प्रा. डॉ. मोहन वानखडे आणि सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. विद्या चौरपगार यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.







Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-01-23(Wed) 11:19(AM)

